| | जनसंपर्क अधिकारी | |
|---|---|---|
| | पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार<br>यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,<br>जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१<br>E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in | |

प्रेस नोट क्र-०५ दिनांक: ०५/०१/२०२४

# प्रेस नोट

## ०३ अपहरीत मुलींचा केवळ ४८ तासात शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्यास माणिकपुर पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०३/०१/२०२४ रोजी ००.३० वा. ते ०५.०० वा.चे दरम्यान वेलकनी हाउस, चुळणा गांव, तलाव रोड, वसई पश्चिम, जि. पालघर येथुन तीन पिडीत मुली यांना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचा अज्ञानाचा फायदा घेवुन कशाचे तरी आमिष दाखवुन फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतुन पळुन नेलेबाबत फिर्यादी नामे श्रीमती सँन्ड्रा बेरनाथ डिसा, वय-३८ वर्षे, व्यवसाय शिक्षिका, रा. वेलकनी हाउस, चुळणा गांव, तलाव रोड, वसई पश्चिम, जि. पालघर यांनी माणिकपुर पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. ०४/२०२४ कलम ३६३ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर घटनेचे गांभिर्य लक्षात घेवुन अपहरीत मुलींचे वय लक्षात घेता त्यांचा लागलीच शोध घेवुन सुरक्षितपणे ताब्यात घेणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने माणिकपुर पोलीस ठाणेकडील ०३ पथके तयार करुन वेगवेगळया दिशेला रवाना करुन अपहरीत मुलींचा शोध सुरु करण्यात आला. दरम्यान माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळावर मिळालेल्या माहितीच्या आधारावर तब्बल २०० ठिकाणचे सी.सी.टी.व्ही कॅमेरे तपासले असता सदरच्या तीन अपहरीत मुली हया दोन मुलांसोबत वसई रेल्वे स्टेशन येथुन लोकलने दादर, बोरिवली, नालासोपारा येथे प्रवास करुन नालासोपारा पुर्व येथुन रिक्षाने वसई फाटा येथे उतरुन रानशेतपाडा, पेल्हार येथे जातांना दिसुन आल्या. तेव्हा वसई फाटा येथील रानशेतपाडा परिसरातील सी.सी.टी.व्ही कॅमेरे तसेच स्थानिक नागरिकांचे मदतीने सदरच्या अपहरीत मुली हया तुंगारेश्वर येथील डोंगरावर राहत असल्याबाबत गुन्हे प्रकटीकरण पथकास गोपनीय माहिती प्राप्त झाल्याने तुंगारेश्वर डोंगरावर रात्रीचे ०८.०० वा.चे सुमारास सुमारे ०३ तास ३ ते ४ किलोमीटर पायी वर चढुन घनदाट जंगल असलेल्या डोंगर परिसर तपासुन सदर ०३ मुली दोन मुलांसह ताब्यात घेवुन पुन्हा रात्रीचे अंधारात ०४ तासांची पायपीट करुन त्यांना सुखरुप डोंगरावरुन खाली आणले. सदर गुन्हयाचा तपास हा गुन्हे प्रकटीकरण अधिकारी, अंमलदार व माणिकपुर पोलीस यांनी सातत्यपुर्ण व चिकाटीने केल्याने केवळ ४८ तासाचे

आत ०३ अपहरीत मुलींचा शोध घेवुन त्यांचे पालकांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु असुन पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करीत आहे.

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले/श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, श्रीमती पद्मजा बढे, सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. राजु माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. मिलिंद साबळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री ऋषिकेश पवळ (पोलीस निरीक्षक प्रशासन) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि. सनिल पाटील, पो.उ.नि. रोहिणी डोके, पो.ह. शैलेश पाटील, पो.ह. शामेश चंदनशिवे, पो.ह. धनंजय चौधरी, पो.शि. गोविंद लवटे, पो.शि. आनंदा गडदे, पो.शि. प्रविण कांदे व म.पो.शि. पुजा कांबळे यांनी यशस्विरीत्या केलेली आहे.

